**कासारवडवली वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४८ /२०२५ — दि. १३/११/२०२५

—: **वाहतूक नियंत्रण अधिसूचना** :—

**ज्याअर्थी**, ठाणे महानगर पालीकेच्या क्षेत्रात **"टाईम्स ऑफ इंडीया"** ग्रुपच्या वतीने रविवार दि.१६/११/२०२५ रोजी सकाळी ०६:३० वा. ते ०९:३० वा. पावेतो **"हॅपी स्ट्रीट"** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मोठया संख्येने नागरीक सहभागी होणार असल्याने सदर रोडवरील व परिसरातील वाहतुक सुनिश्चित व्हावी, या करीता आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी पंकज शिरसाट, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वाहतुक विभागाचे पोलीस उप आयुक्त म्हणुन, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही. ए./११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुण पुढीलप्रमाणे अधिसुचना जाहीर करीत आहे.

**प्रवेश बंद**— १) वसंत विहार सर्कल कडुन काशिनाथ घाणेकर नाट्यगृह व खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहनांना **वसंत विहार सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग**— वसंत विहार सर्कल कडुन काशिनाथ घाणेकर नाट्गृह व खेवरा सर्कल कडे जाणारी वाहने वसंत विहार सर्कल जवळुन उजवीकडे वळण घेवुन विरुध्द दिशेने खेवरा सर्कल कडुन वसंत विहार सर्कलकडे येणाऱ्या वाहीनी वरुन इच्छित स्थळी जातील.
( नमुद दिनांक व वेळेत खेवरा सर्कल कडुन वसंत विहार सर्कलकडे येणारा रस्ता हा दोन्ही बाजुच्या वाहनांच्या रहदारी करीता खुला असणार आहे.)

सदरची वाहतुक अधिसुचना रविवार दि.१६/११/२०२५ रोजी सकाळी ०६:३० ते ०९:३० वा. पावेतो अंमलात राहील. सदरची अधिसुचना पोलीस वाहने, रूग्णवाहीका, फायरब्रिगेड व अत्यावश्यक सेवेतील वाहने यांना लागु राहणार नाही.

( **पंकज शिरसाट** )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्द अधिकारी, ठाणे.
२/— सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे.
मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५/ वि.शा. ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक,ठाणे.
परिवहन व्यवस्थापनक,ठा.म.पा.ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
प्रत:— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.
प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे.
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. कासारवडवली वाहतूक उपविभाग ठाणे.